# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 272/2020 दिनांक: 05/05/2020

वाचा —
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 242 /2020 दिनांक 19.04.2020
7. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्र. DMU/२०२०/CR.92/ DisM-1 Dated 2nd May 2020
8. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि- 270 /2020 दिनांक 19.04.2020

Office Of The District Magistrate ★ AKOLA ★ सत्यमेव जयते

**संचारबंदीचे कालावधीमध्ये लग्नसमारंभास परवानगी देणे बाबत.**

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/ DisM-1 दिनांक 2 मे 2020 नुसार दिनांक 17 मे 2020 पर्यंत संचारबंदी पुढे कायम ठेवणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. त्या अनुषंगाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव फैलाव होण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे झाले असल्यामुळे **दिनांक** 03.05.2020 **चे मध्यरात्रीपासून ते** 17.05.2020 **चे मध्यरात्रीपर्यंत** संदर्भीय आदेश क्र. 8 नुसार व या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश कायम ठेवून **संचारबंदी** लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी,** वाचा क्र. 7 मध्ये महाराष्ट्र शासन यांनी या लॉकडाऊनमध्ये पालन करावयाच्या नविन मागदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 02 मे, 2020 चे मार्गदर्शक सूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अकोला जिल्हयातील विवाह समारंभास परवानगी देण्याकरिता **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी** यांना त्यांचे क्षेत्राकरिता **परवानगी अधिकारी** म्हणून प्राधीकृत करण्यात येत आहे. त्यांनी खालील प्रमाणे नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार आपआपल्या क्षेत्रामध्ये विवाह समारंभाकरिता परवानगी प्रदान करावी.

1. विवाह निश्चित झालेल्या अथवा आगामी काळात संपन्न होणा-या विवाहाकरिता वर वधू यांना वगळता केवळ चार व्यक्ती यांना परवानगी देण्यात यावी. यापेक्षा जास्त संख्या अनुज्ञेय राहणार नाही.
2. लग्न समारंभ अत्यंत साध्या पध्दतीने घरगुती स्वरुपात करण्यात यावा.



NitinN 371

3. **Containtment Zone** म्हणून निश्चित केलेल्या प्रतिबंधीत क्षेत्राकरिता लग्न समारंभ अथवा कोणत्याही समारंभाची **परवानगी देण्यात येवू नये.**
4. लग्न समारंभास उपस्थित राहणा-या सर्वसंबधीतांची आरोग्य तपासणी करुन कोव्हीड-19 ची कोणतीही लक्षणे नसल्याबाबत नोंदणीकृत शासकीय / खाजगी वैद्यकिय अधिकारी यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.
5. लग्न समारंभाकरिता परवाना अधिकारी यांनी जिल्हयातंर्गत तसेच जिल्हयाबाहेर निश्चित स्थळी जाण्या-येण्याकरिता केवळ **एका वाहनास** परवानगी द्यावी.
6. वापरण्यात येणारे वाहन निर्जंतुकीकरण करणे, तसेच चेह-यावर मास्क लावणे व सोशल डीस्टंसिंगचे नियम पाळणे बंधनकारक राहील.
7. वापरण्यात येणा-या वाहनाचा नोंदणी क्रमांक व परवाना क्रमांक परवान्यावर नमूद करावा.
8. लग्न समारंभाकरिता अकोला जिल्हयामधून इतर जिल्हयात / राज्यात जायचे असल्यास किंवा अकोला जिल्हयामध्ये यावयाचे असल्यास , त्या-त्या जिल्हयामधील/ राज्यामधील विविध पध्दतीने प्राधिकृत केलेल्या **सक्षम अधिकारी** यांची प्रवास व वाहनाबाबतची परवानगी घेणे बंधनकारक आहे.
9. परवानगी अधिकारी यांनी लग्न समारंभ ज्या ठिकाणी आयोजित केला आहे त्या ठिकाणाचे **संबंधीत पोलीस स्टेशनला** अवगत करणे बंधनकारक आहे.
10. परवानगी अधिकारी यांनी परवानगी देतांना या कार्यालयाने कोरोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याचे दृष्टीने वेळोवेळी निर्गमित केलेल्या **आदेशांचा भंग होणार नाही** याची दक्षता घेण्यात यावी.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 04 **मे** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

Office Of The District Magistrate AKOLA
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,**भाप्रसे**)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. उपविभागीय अधिकारी ----------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. तहसिलदार ---------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**